# Status of Women at 75th Anniversary of Indian INDEPENDENCE



Dr. Rajani Shikhare
Dr. Pravin Sonune
Dr. Hanmant Helambe
Dr. Santosh Nagre

# Status of Women at 75th Anniversary of Indian Independence

**Dr. Rajani Shikhare**

**Dr. Pravin Sonune**

**Dr. Hanmant Helambe**

**Dr. Santosh Nagre**

walnutpublication.com

INDIA • UK • USA

**Copyright © Dr. Rajani Shikhare, Dr. Pravin Sonune, Dr. Hanmant Helambe & Dr. Santosh Nagre, 2021**

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, recording or otherwise, without the prior written permission of the authors.

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the authors. The authors of chapters are solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The publisher does not endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein. The publisher and the authors make no representations or warranties of any kind with respect to this book or its contents. The authors and the publisher disclaim all such representations and warranties, including for example warranties of merchantability and educational or medical advice for a particular purpose. In addition, the authors and the publisher do not represent or warrant that the information accessible via this book is accurate, complete or current.

eBook ISBN: 978-93-5574-033-5

First Published in December 2021

Published by Walnut Publication (an imprint of Vyusta Ventures LLP)
www.walnutpublication.com

**USA**

6834 Cantrell Road #2096, Little Rock, AR 72207, USA

**India**

#625, Esplanade One, Rasulgarh, Bhubaneswar – 751010, India

#55 S/F, Panchkuian Marg, Connaught Place, New Delhi - 110001, India

**UK**

International House, 12 Constance Street, London E16 2DQ, United Kingdom

# स्वातंत्र्याची 75 वर्ष स्त्री आणि भारतीय संविधान

डॉ. संदीप अ बनसोडे,
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई
sandeepabansode07@gmail.com

स्वातंत्र्याची 75 वर्ष आणि महिलांची आजची स्थिती अभ्यासत असताना सुरुवातीला म्हणजेच स्वातंत्र्यापूर्वी महिलांची स्थिती काय होती याची पार्श्वभूमी घेणे महत्त्वाचे ठरते.

लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला तर जवळपास ४८ टक्के लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. ही स्थिती नैसर्गिक आणि जैविक आहे, नैसर्गिकदृष्ट्या स्त्रीला मिळालेला दर्जा स्पष्ट आहे. हा दर्जा मिळवताना तिला विचारले जाण्याचा प्रश्न येतच नाही. स्त्री ही लैंगिक आणि शारीरिकदृष्ट्या पुरुषापेक्षा भिन्न दिसते आणि प्रत्यक्षात आहे सूद्धा. आणि लैंगिकदृष्ट्या तिचे कार्य ही स्वतंत्र आणि वेगळे आहे या वेगळ्या लैंगिक रचनेमुळे आणि गर्भाशया सारख्या खास अशा शारीरिक रचनेमुळे पिलाजी उत्पादनाचे आणि प्रजननाचे कार्य करावे लागते जे पुरुष करू शकत नाही हा अर्जित दर्जा मानवी वा तांत्रिक नियमांनी किंवा प्रक्रियांनी बदलता येणारा नाही या कायमस्वरूपी भेजा मुळे स्त्रिया आणि पुरुष या मानवाच्या दोन स्वतंत्र वर्गामध्ये सर्व प्रकारचे सहकार्याचे समन्वयाचे आणि संघर्षाचे संबंध जोपासले जातात अर्जित दर्जामुळे पुरुषापेक्षा भिन्न असणे ही सत्यस्थिती मान्य होण्यासारखे आहे परंतु भिन्न असणे म्हणजेच गवळण असणे असा अर्थ मात्र होत नाही सर्व धर्मांमध्ये स्त्रीचा हा भिन्न दर्जा स्पष्ट करून सांगताना तो तू गौन मात्रा मानला जातो स्त्रीला माणूस म्हणून समान दर्जा नव्हता तर स्त्री ही पुरुषासाठी निर्माण झालेली आहे असे धर्मगुरूंनी आणि पुरोहितांनी धार्मिक ग्रंथाचे वेगवेगळे आधार देऊन सांगितले स्त्रीला अंधारात व चार भिंती मध्ये ठेवले जाण्याचा काळ पुष्कळ मोठा होता अनिष्ट रूढी बालविवाह विधवा विवाहास बंदी जरठ-कुमारी यांचे प्रश्न सती जाणे पडदा पद्धती देवदासी यामुळे स्त्री बंदिस्त राहिली

मात्र हळूहळू करते अनेक समाज सुधारक यांनी स्त्रियांच्या आणि एकूणच समाज व्यवस्थेतील जीर्ण रूढी परंपरांना फाटा देत स्त्रियांच्या उद्धारासाठी आणि सबलीकरणासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न

केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने या सर्व प्रयत्नांना घटनेमध्ये स्थान देऊन स्त्रीचा खऱ्या अर्थाने उद्धार केला गेला.

डॉ. आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य हे मानव जातीला प्रेरणा देणारे आहे त्यांचे जीवनच खऱ्या अर्थाने एक प्रकारची प्रेरणा ठरू शकते असेच कार्य त्यांनी आपल्या जीवनामध्ये केलेले दिसून येते . त्यांनी पुकारलेले सामाजिक लढे, चळवळी प्रसंगी केलेली आंदोलने आणि या दरम्यानची त्यांची भाषणांतून केलेली विचार मांडणी ही खरेतर आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावी अशा स्वरूपाची आहे. महिला सशक्तीकरणासाठी ज्यावेळी आंबेडकर विचार करतात त्यावेळी स्त्री आणि पुरुष यांच्यातील समानतेवर ते भर देताना दिसतात. भारतीय समाजव्यवस्थेत प्राचीन काळापासून अन्याय अत्याचार झालेला दिसून येतो, आणि तेव्हापासूनच स्त्रीलाही कमी लेखण्याची प्रवृत्ती मानवी मनामध्ये रुजलेली होती. या प्रवृत्तीमागे काही धार्मिक अंधश्रद्धा सुद्धा आहेत. या सर्व बाबतीतला विचार करून स्त्रीमुक्तीसाठी आणि स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी आंबेडकरांनी भरपूर कार्य करून ठेवलेले आहे.

महिलेला सक्षम करणे म्हणजे प्रथमतः स्त्री-पुरुषांमधील समानतेची बीजे पेरणे होय, हे आंबेडकर जाणून होते. आणि म्हणून महिला नेतृत्व विकास, आर्थिक स्वातंत्र्य या बाबी आवश्यक असल्याचे बाबासाहेबांच्या लक्षात आले त्यामुळे त्यांनी सार्वजनिक चळवळी करत असताना यामध्ये जाणीवपूर्वक महिलांना सामावून घेतल्याचे दिसून येते.1927 चा चवदार तळ्याचा सत्याग्रह पाहिला असता आपल्या असे लक्षात येते कि, सत्याग्रहामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिला देखील जवळ जवळ तेवढ्याच संख्येने सहभागी झाल्या होत्या. यामागे केवळ प्रेरणा ही आंबेडकरांची आहे. एवढेच नव्हे तर जुलै 1942 मध्ये नागपूर येथे महिला परिषदेचे आयोजनही आंबेडकरांनी केले आणि त्याला महिलांच्या वतीने मोठा प्रतिसाद मिळाला, हा
प्रतिसाद पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर खरोखरच प्रभावित झाले होते. या परिषदेमधील आपले विचार मांडण्याच्या दरम्यान बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात," या देशातील महिला या पुरोगामी आहेत त्यांनी त्यांच्या प्रगतीमध्ये ठरत असणाऱ्या रूढी परंपरांचा त्याग करावा व शिक्षणावर अधिक भर द्यावा शिक्षणाद्वारे महिला शक्तिशाली होतील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे साधन हे शिक्षण आहे" इथे आंबेडकरांना माहिती होते की गेल्या अनेक काळापासून

भारतीय समाजव्यवस्थेने महिलांना शिक्षण नाकारलेले आहे महिलांचे सशक्तीकरण करावयाचे असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे या शिक्षणाचा

सर्वाधिक परिणाम हा ध्येय म्हणजेच महिलांचा स्वाभिमान, महिलांचे स्वावलंबन आणि महिलाचा आत्मउद्धार यांचा विकास करणे होय. मतदानाचा हक्क मिळण्यासाठी युरोपातील महिलांना संघर्ष करावा लागला पण हाच मतदानाचा हक्क बाबासाहेबांनी भारतीय समाजातील महिलांना सहजरीत्या मिळवून दिला आहे. याकरिता त्यांनी कायद्याद्वारे महिलांना घटनात्मक सुरक्षा पुरवलेली असून त्यांना अनेक अधिकार सुद्धा दिलेले आहेत.

महिला स्वातंत्र्याची सनद म्हणूनज्याकडे पाहिले जाते ते म्हणजे हिंदू कोड बिल होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1949 मध्ये हिंदू कोड बिल तयार करून घटना समितीपुढे मान्यतेसाठी ठेवले होते, मात्र या कोड बिलातील स्त्रीपुरुष समानता, मालमत्तेचे, विवाह घटस्फोट, दत्तक घेणे, अज्ञानता आणि स्त्रीधनाचा ताबा, हे महत्वपूर्ण मुद्दे महिलांच्या संदर्भात होते हिंदू कोड बिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले असल्यामुळे त्याला बराच विरोध झाला 1951मध्ये हे बिल लोकसभेत सादर केले गेले, परंतु दुर्दैवाने या विधेयकाला पंडित नेहरू यांच्यासह सरदार पटेल, श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी विरोध केल्याने हे बिल संसदेमध्ये पास होऊ शकले नाही. त्यामुळे दुःखी होऊन डॉ. बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. महिलांना समाजात दर्जा द्यायचा असेल तर हिंदू कोड बिल पास होणे गरजेचे होते. पण ते पास होऊ शकले नाही. हे कोडबिल पास होण्यासाठी बाबासाहेबांनी अखेरपर्यंत प्रयत्न केला. प्रत्युत्तपदाखल त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. महिलांच्या हक्कांसाठी, मंत्रीपद सोडणारे या देशातील पहिले नेते म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. सन 1955 मध्ये हेच हिंदू कोड बिल वेगळ्या स्वरूपात मंजूर झाले. ते म्हणजे, हिंदू विवाह कायदा. या कायद्यामुळे महिला सक्षमीकरणासाठीचे डॉ. आंबेडकरांचे स्वप्न हे अंशतः पूर्ण झाल्याचे दिसून येते. महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा मिळाला पाहिजे आणि तो आता बऱ्यापैकी मिळालेला दिसूनही येतो. यामुळे महिला समाजात स्वाभिमानाने जगण्यासाठी पुढे येताना दिसून येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री असताना महिला सशक्तीकरणासाठी विविध निर्णय त्यांनी घेतल्याचे लक्षात येते. खाण कामगार महिला यांना प्रस्तीसाठी भत्ता, पुरुषांबरोबरीचे जे असेल ते वेतन, मजूर व कष्टकरी महिलांसाठी 21 दिवसाची किरकोळ परंतु पगारी

रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई, वीस वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास सेवानिवृत्ती यांसारखे अनेक महत्त्वाचे निर्णय बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेले असून त्यांची अंमलबजावणी सुद्धा केलेली आहे. भारतीय राज्यघटनेत महिलांना सशक्त बनवण्यासाठी विविध तरतुदी आपल्याला दिसून येतात. या अनुच्छेद 14, 15 (3) या अंतर्गत महिला अधिक सक्षम करण्यास मदत होते, तर महिला सक्षम व्हाव्यात यासाठी समान कामासाठी समान वेतन प्रसूती रजा, पोषण जीवनमानाच्या संबंधी अनेक तरतुदी केलेल्या दिसून येतात. एवढेच नव्हे तर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आज स्त्रियांना प्रतिनिधीत्व मिळताना दिसून येते. यासाठी अनुच्छेद क्रमांक 243 मध्ये तरतूद केल्याचे समजते. आज स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जवळजवळ पन्नास टक्के प्रतिनिधित्व हे महिलांना मिळायचे दिसून येते मात्र तरीसुद्धा खऱ्या अर्थाने महिला सर्व अधिकार स्वतः गाजवतात का? हाही एक अभ्यासाचा भाग आहे.

आज महिला समाजामध्ये अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवताना दिसून येतात, मग ते राजकारण असेल समाजकारण, उद्योग, शिक्षण, किंवा अगदी विमान चालक म्हणून पायलट या सर्व क्षेत्रात स्त्रिया आपली उल्लेखनीय कामगिरी बजावताना दिसून येतात. हे सर्व शक्य झाले ते केवळ आणि केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्यामुळे मात्र असे जरी असले तरी अजूनही शिक्षणक्षेत्रात ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण वाढवण्याची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व जाती धर्माचा अभ्यास करून स्त्रियांना हक्क मिळावेत म्हणून सातत्याने संघर्षात्मक पवित्रा घेऊन महिलांना न्याय मिळवून दिलेला आहे.ते म्हणतात, "कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलांच्या परिस्थितीवरून दिसते." अशाप्रकारे अभ्यासाअंती हे दिसून येते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूस म्हणून जे स्वातंत्र्य असायला हवे तर मिळवून दिलेच परंतु महिलांना सुद्धा
आपल्या न्याय्य हक्काची जाणीव करून दिली. महिलांना सुद्धा आपले स्वतःचे नैसर्गिक हक्क आहेत, याचा विचार करायला भाग पाडले. महिलांनी स्वतंत्ररीत्या विचार करावा, समान न्याय मिळावावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. म्हणजेच खऱ्या अर्थाने या स्वतंत्र भारत देशामध्ये महिलांचा खरा उद्धारकर्ता कोणी असेल तर तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत यात तिळमात्रही शंका नाही.

असे जरी असले तरी देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना वस्तूस्थिती म्हणून अभ्यासायला गेले तर हाच निष्कर्ष काढावा लागतो की, औद्योगीकरणाने लादलेले अपरिहार्य व एकांगी बदल वगळता स्त्रीजीवनात महत्त्वाचे परिवर्तन झालेले नाही. स्त्रिया आजही वेठीच्या मजूर किंवा गुलाम असून त्या कुटुंबाच्या बंदिवान आहेत. तथापि, भारतीय समाजाला स्त्रियांचीच नव्हे तर कोणत्याही सामाजिक गटाची गुलामगिरी यापुढे परवडणारी नाही. कारण औद्योगीकरण अधिकाधिक झपाटयाने करून समाजामधली सुखसम्रुध्दी वाढवायची आहे. समाजरचनेची जुनी पायऱ्या पायऱ्यांची व विषम पातळ्यांची व्यवस्था जागोजाग तुटून तकलादू
बनली असल्याची जाणीव समाजधुरीणांना झाली असल्याने त्यांनी समता. स्वतंत्रतावादी संविधान घडविले व हे उद्दिष्ट गाठण्यासाठी लोकसत्ता स्थापन केली. स्त्रियांवरील तिहेरी ओझे त्याचा अन्वयार्थ आपल्याला नीटसा स्पष्ट झालेला नाही.

स्त्री उन्नती कडे थोडे सकारात्मक दृष्टीने पाहिले तर अधिकारी बाईही घरी गृहिणीच असल्याचे सत्य लपवता येत नाही बाई अधिकारी झाली तरी घरी येताच ती गृहिणी होतेच व पूर्वीप्रमाणे तिने चहाचे आंदण चढवावे अशी सर्वांची अपेक्षा असते. हे कटू सत्यही नाकारून चालणार नाही

संदर्भसूची :


1. डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती, प्रा. प्रतिमा परदेशी सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे, आवृत्ती 2019
2. भारतीय संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, आवृत्ती 2009
3. पत्रकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, गंगाधर पानतावणे प्रतिमा प्रकाशन, पुणे 30, आवृत्ती 1996
4. धर्म आणी लोकसाहित्य, दुर्गा भागवत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवत्ती 1974
5. भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती 1994
6. स्त्री परिवर्तनाची आव्हाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ द्वारे प्रकाशित ग्रंथ